क्रमांक : २४१९७ / क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन,
मुंबई, दिनांक : ६ डिसेंबर, २०२२

:: **कार्यालयीन आदेश** ::

श्री.किशोर गांडा बोरीचा या सचिवालयात सफाईदार पदावर कार्यरत होते. ते दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांनी दि. ७ जून, २०२२ रोजी त्यांचे वारसास वारसा हक्काने या सचिवालयात नोकरी देण्याबाबत या सचिवालयास अर्ज सादर केला. श्री.किशोर गांडा बोरीचा यांच्या सदर अर्जास अनुसरून त्यांची मुलगी कु.योगिता कि.बोरीचा यांची "लाड समितीच्या शिफारशींनुसार सफाई कामगारांच्या नियुक्तीबाबत वारसा हक्काची अंमलबजावणी पुढे चालू ठेवण्याबाबत" सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय क्र.सफाई-२०१५/प्र.क्र.२६८/महामंडळे, दिनांक ११ मार्च, २०१६ मधील तरतूदी विचारात घेऊन या सचिवालयातील 'सफाईदार' (गट-ड) या पदावर एस-१ : रु.१५०००-४७६०० या वेतनस्तरातील खालील अटींच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती करण्यात येत आहे:-

(एक) कु.योगिता कि.बोरीचा यांनी सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १ महिन्याच्या कालावधीत या सचिवालयात रुजू व्हावे.

(दोन) या सचिवालयाच्या सेवेत रुजु होताना त्यांनी श्री.किशोर गांडा बोरीचा यांचा त्या हयात असेपर्यंत सांभाळ करण्याबाबत लेखी हमी देणे बंधनकारक राहील.

(तीन) कु.योगिता कि.बोरीचा यांची" सफाईदार" पदावरील नियुक्ती वैद्यकियदृष्ट्या पात्रतेच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

(चार) कु.योगिता कि.बोरीचा यांची नियुक्ती तात्पुरती असून, सदर नियुक्ती त्यांचे पुर्वचारित्र्य, वर्तणूक व वैद्यकीय तपासणी अहवाल इ.वर अवलंबून राहील.

(पाच) कु.योगिता कि.बोरीचा यांची सफाईदार पदावरील नियुक्ती ही वारसा हक्काने करण्यात आली असल्यामुळे त्यांची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असुन ती पूर्वसुचनेशिवाय कोणत्याही वेळी समाप्त केली जाऊ शकेल. नियुक्तीनंतर कोणत्याही कारणास्तव त्यांना या सचिवालयाच्या सेवेचा राजीनामा द्यावयाचा असेल तर त्यांनी नियमानुसार या सचिवालयास त्यासंबंधीची लेखी सुचना एक महिना आगाऊ देणे आवश्यक आहे अन्यथा त्यांना एका महिन्याचे मूळ वेतन या सचिवालयास जमा करावे लागेल.

(सहा) कु.योगिता कि.बोरीचा यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ च्या नियम ४ नुसार विहीत नमुना 'अ' मधील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

(सात) वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक अंनियो/१००५/१२६/सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ तसेच वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक अंनियो/२०१५/(NPS) प्र.क्र.३२/ सेवा-४ दिनांक ६ एप्रिल, २०१५ मधील तरतूदींनुसार त्यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS) लागू राहील.

(आठ) कु.योगिता कि.बोरीचा यांनी त्यांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून सहा महिन्यांचे आत करून घेणे आवश्यक आहे.

(नऊ) शासकीय कर्मचाऱ्यांकरीता विहीत केलेल्या सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

(दहा) कु.योगिता कि.बोरीचा यांनी त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत स्वग्राम घोषित करणे आवश्यक आहे. तद्नंतर त्यांनी स्वग्राम घोषित केल्यास संपूर्ण सेवेच्या कालावधीत घोषित केलेल्या स्वग्रामामध्ये बदल करता येणार नाही.

(अकरा) कु.योगिता कि.बोरीचा ह्या माझी "सफाईदार" म्हणून झालेली नेमणूक ही तात्पुरती असून कोणतीही सुचना न देता आणि कोणतीही कारणे न देता, कोणत्याही वेळी मला सेवेतून कमी करता येईल याची मला जाणीव आहे आणि त्या आधारावर मी ही नेमणूक स्विकारत आहे", असे हमीपत्र नियुक्तीनंतर त्वरीत सादर करतील.

आदेशानुसार,

**( सुभाष नलावडे )**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति**

कु.योगिता कि.बोरीचा,
रुम.नं.१०६, पहिला मजला,
बी विंग, रामदेव नगर नं.२
एस.आर.ए.सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्या.)
जे.आर.ए.बोरीचा मार्ग,
मुंबई – ४०० ०११.

...३/-

**प्रतिलिपी : -**

१) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.

२) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

३) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

५) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

६) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

८) वैयक्तिक नस्ती.

९) निवडनस्ती.